**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०५ .२०)**

**रविवार दिनांक ११ मे २०२५**

**ठळक बातम्या**

- **पाकिस्तानबरोबर शस्त्रसंधी केल्यानंतर पंतप्रधानांची महत्त्वाची बैठक**
- **राज्यातील सर्व मोटार परिवहन सीमा चौक्या कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती**
- **नागपूर येथील राष्ट्रीय लोक अदालत आणि विशेष अभियानात विक्रमी ८४ हजार प्रकरणे निकाली**
- **खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंची ७४ पदकांची कमाई आता सविस्तर बातम्या**

बैठक

पाकिस्तानबरोबर शस्त्रसंधी जाहीर केल्यानंतर आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतल्या निवासस्थानी महत्त्वाची बैठक घेतली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग तसंच तिन्ही सेनादलांचे प्रमुख बैठकीला उपस्थित होते. युद्ध विरामाच्या घोषणेनंतर पंतप्रधानांनी काल घेतलेल्या बैठकीला परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. सुब्रह्मण्यम जयशंकर, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि तिन्ही सेनादलांचे प्रमुख उपस्थित होते. भारतानं पाकिस्तानच्या कुरापतींना प्रत्युत्तर देण्यासाठी सुरू केलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर ही बैठक झाली. कोणत्याही दहशतवादी कृत्याला देशाविरुद्ध युद्धाची कृती मानून त्याला प्रत्युत्तर देण्याचा निर्णय भारतानं घेतला आहे, अशी माहिती सरकारी सूत्रांनी दिली.

राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस

भारतानं ऑपरेशन सिंदूर अंतर्गत केलेली कारवाई म्हणजे भारताच्या राजकीय, सामाजिक आणि धोरणात्मक इच्छाशक्तीचं तसंच आणि लष्करी सामर्थ्य आणि निर्धारचं प्रतीक आहे, असं केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. सिंह

यांनी आज दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून लखनऊ इथल्या ब्राम्होस एकात्मिकरण आणि चाचणी सुविधा केंद्राचं उद्घाटन केलं, त्यावेळी ते बोलत होते.

***जिन भारत विरोधी और आतंकी संगठनों ने भारत माता के मस्तक पर हमला करके कई परिवारों के सिंदूर मिटाए थे, उन्हें भारतीय सेना ने ऑपरेशन सिंदूर के माध्यम से इंसाफ दिलाने का काम किया है और इसके लिए आज सारा देश भारतीय सेनाओं का अभिनंदन कर रहा है। ऑपरेशन सिंदूर सिर्फ एक सैन्य कार्रवाई भर नहीं है, बल्कि भारत की राजनैतिक, सामाजिक और सामरिक इच्छा शक्ति का प्रतीक है।***

हा प्रकल्प म्हणजे भारतानं संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेच्या दिशेनं टाकलेलं मोठं पाऊल आहे आणि यामुळे भारताची ताकद वाढेल, असं ते म्हणाले. ब्रह्मोस हे केवळ शस्त्र नाही, तर ते शत्रूला भारतीय सशस्त्र दलांच्या सामर्थ्याचा इशारा देणारं आणि सीमांचं रक्षण करण्याच्या वचनबद्धतेचा संदेश आहे, असं त्यांनी सांगितलं. आज राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन असल्यानं सुविधा केंद्राच्या उद्घाटनाला विशेष महत्व आलं असल्याचं ते म्हणाले. १९९८ मध्ये याच दिवशी तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वात पोखरणमध्ये अणुचाचण्या करून शास्त्रज्ञांनी जगाला भारताची ताकद दाखवून दिली होती, याचं स्मरणही त्यांनी यावेळी केलं.

मोटार परिवहन सीमा चौक्या

केंद्र सरकारच्या निर्देशांनुसार आणि वस्तू आणि सेवा कर (GST) प्रणालीच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने, महाराष्ट्र सरकारने राज्यातील सर्व मोटार परिवहन सीमा चौक्या ( RTO border check post) कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा उद्देश आंतरराज्य वाहतूक सुरळीत करणे आणि व्यावसायिक वाहनांच्या हालचालीतील अडथळे दूर करणे हा आहे, अशी माहिती परिवहन मंत्री  प्रताप सरनाईक यांनी दिली.1966 मध्ये स्थापन झालेल्या या सीमा चौक्यांचा उद्देश वाहनांची हालचाल नियंत्रित करणे, परिवहन नियमांचे पालन सुनिश्चित करणे आणि रस्ते कर वसूल करणे असा होता. मात्र GST लागू झाल्यानंतर आणि डिजिटल अंमलबजावणीच्या उपाययोजनांमध्ये झालेल्या प्रगतीमुळे प्रत्यक्ष चौकशीसाठी स्थापन केलेल्या या सीमा चौकींची आवश्यकता आता उरलेली नाही.  या निर्णयामुळे महाराष्ट्र १८ इतर राज्यांप्रमाणे आधुनिक, कागदविरहित

आणि तंत्रज्ञानाधिष्ठित परिवहन देखरेखीच्या प्रणालीचा अवलंब करणाऱ्या राज्यांमध्ये समाविष्ट होत आहे.

लोक अदालत

नागपूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नागपूरतर्फे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथाजिल्हा विधी सेवा प्राधीकरणाचे अध्यक्ष डी.पी. सुराणा यांचे मार्गदर्शनाखाली का10 मे रोजी आयोजित राष्ट्रीय लोक अदालत व विशेष अभियानात विक्रमी ८४ हजार प्रकरणे निकाली निघाली. जिल्हा न्यायालय, नागपूर, कौटुंबिक न्यायालय, कर्ज वसूली न्यायाधीकरण, सहकार न्यायालय औद्योगिक व 'कामगार न्यायालय आणि नागपूर जिल्हयातील सर्व' तालूका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये दिवाणी दावे, भुसंपादन प्रकरणे, तडजोडीयोग्य फौजदारी प्रकरणे वैवाहिक वाद. मोटार अपघात दावे, विद्युत अधिनियमाची प्रकरणे, ट्रॅफिक ई-चालान प्रकरणे आणि इतर दाखलपूर्व प्रकरणे समोपचाराने निपटारा करण्यासाठी ठेवण्यात आली होती. याला हजारो नागरिकांनी व पक्षकारांनी सहभाग नोंदवून उत्स्फर्त प्रतिसाद दिला.

खेलो इंडिया

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आघाडी कायम ठेवत ७४ पदकांची कमाई केली आहे. अदिती हेगडेनं आतापर्यंत सहा पदकं मिळवली आहेत. कऱ्हाडच्या रिक्षाचालकाची कन्या अस्मिता ढोणे हिनं एकंदर १७० किलो वजन उचलून ४९ किलो गटात सुवर्ण पदक जिंकलं. आकांक्षा व्यवहारेनं भारोत्तोलन प्रकारात ४५ किलो गटात सुवर्ण पदक मिळवलं, तर टेबल टेनिस मध्ये काव्या भटनं सलग दुसऱ्या दिवशी सुवर्णपदकावर आपलं नाव कोरलं. २७ सुवर्ण, २२ रजत आणि २५ कांस्य पदकांसह महाराष्ट्र पदक तालिकेत अव्वल स्थानावर आहे. १४ सुवर्ण पदकांसह ३९ पदकं मिळवून कर्नाटक दुसऱ्या स्थानावर, तर राजस्थान २३ पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

निसर्गानुभव

उद्या १२ मे रोजी बुद्धपौर्णिमेच्या लख्ख प्रकाशात १९७ निसर्गप्रेमींना संपूर्ण रात्र जंगलातील थरार अनुभवण्याची संधी प्राप्त झाली असून त्यांना प्राण्यांची गणना करावी लागणार आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत १२ मे रोजी निसर्गानुभव कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. या कार्यक्रमांतर्गत मचाण बुकिंगची सुविधा मॅजिक

मेळघाट डॉट. इन या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली होती. ३१० जणांनी ऑनलाईन बुकींग केली होती. त्यापैकी १९७ जणांचे अर्ज मंजूर करण्यात आले. प्रत्येक मचाणावर एका निसर्गप्रेमीसोबत वनविभागाकडून एक गाईड किंवा वन कर्मचारी राहणार आहे. यासाठी निसर्गप्रेमींना प्रत्येकी ३ हजार रुपये शुल्कसुद्धा द्यावे लागणार असून उद्या सकाळी ११ वाजता नियोजित स्थळांवर रिपोर्टींग करावे लागणार आहे.

हत्तीचा कळप

आज सकाळी गडचिरोली जिल्ह्यातल्या आरमोरी तालुक्यातील मानापूर येथे दोन मोठे टस्कर हत्ती आल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. हत्तींना पाहताच रस्त्याने जाणारी एक महिला घाबरून खाली पडल्याने जखमी झाली.सध्या गडचिरोली, आरमोरी, देसाईगंज आणि कुरखेडा या तालुक्यांमध्ये रानटी हत्तींचे आवागमन सुरू आहे. पंधरा दिवसांपूर्वी गडचिरोलीनजीकच्या वाकडी परिसरात रानटी हत्तींनी उन्हाळी धानपिकाचे नुकसान केले. काल रात्री दोन टस्कर हत्ती चातगाव वनपरिक्षेत्रातील मरेगाव, गिलगाव परिसरात होते. त्यानंतर ते रांगीमार्गे गेले. आज सकाळी ६ वाजताच्या सुमारास या हत्तींनी आरमोरी तालुक्यातील मानापूर गावात प्रवेश केला. यामुळे आबालवृद्धांची तारांबळ उडाली. हत्ती गावात आल्याचे समजताच वनविभागाचे कर्मचारीही तेथे दाखल झाले. वनकर्मचारी आणि गावकऱ्यांनी हत्तींना हाकलून लावले.

इरई नदी खोलीकरण

चंद्रपूर शहराची जीवनवाहिनी असलेल्या इरई नदीच्या खोलीकरणाचे काम सर्वांच्या सहकार्याने हाती घेण्यात आले आहे. या कामाच्या प्रगतीची पाहणी करण्याकरिता राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी प्रत्यक्ष खोलीकरण होत असलेल्या ठिकाणी भेट दिली. चंद्रपूर शहराला 9 कि.मी. समांतर वाहणा-या इरई नदीच्या खोलीकरणाच्या कामाचा शुभारंभ 25 एप्रिल 2025 रोजी करण्यात आला, असे सांगून पालकमंत्री डॉ. उईके म्हणाले, चालू महिन्याअखेर पर्यंत सर्व नियोजित काम पूर्ण करावे. तसेच नदीतील गाळ शेतकऱ्यांना विनामूल्य देण्यात येत आहे. आतापर्यंत 400 ब्रास गाळ मोफत वाटप करण्यात आला असून अर्ज केलेल्या सर्व शेतकऱ्यांना गाळ प्राधान्याने द्यावा, अशा सूचना त्यांनी केल्या.

प्रादेशिक बातमीपत्र

आकाशवाणी नागपूर केंद्रावरून प्रसारित होणाऱ्या प्रादेशिक बातमीपत्राच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. त्यानुसार संध्याकाळी 6 वाजताचं प्रादेशिक बातमीपत्र संध्याकाळी 5 वाजून 20 मिनिटांनी, प्रसारित होईल. पुढील आदेश येईपर्यंत हा वेळेतील बदल कायम राहणार आहे.

अकरावी प्रवेश प्रक्रिया

राज्यात यंदा अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन आणि केंद्रीय पद्धतीने राबवली जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार आवडीचे महाविद्यालय घरबसल्या निवडता येणार आहे. यात विद्यार्थ्यांसह पालकांची वेळ आणि पैशांची बचत होणार आहे. विशेष म्हणजे ११ ऑगस्टपासून महाविद्यालये सुरू होणार असून, १५ ऑगस्टपर्यंत प्रवेशाचे सर्व टप्पे पूर्ण करण्यात येतील, अशी माहिती माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण विभागाचे संचालक संपत सूर्यवंशी यांनी दिली. याबाबत राज्य सरकारच्या वतीने mahafyjcadmissions.in हे संकेतस्थळ आणि ८५३०९५५५६४ हा हेल्पलाइन क्रमांक देण्यात आलेला आहे, अशी माहिती सूर्यवंशी यांनी दिली.

व्हिडीओ गेमच्या चित्रफिती

भारत पाकिस्तान दरम्यान तणाव असताना युद्धाच्या व्हिडीओ गेमच्या चित्रफिती भारत-पाकिस्तान संघर्षाच्या खऱ्या चित्रफिती म्हणून प्रसारित केल्या जात आहेत. अशा बनावट संदेशांपासून सावध रहावं तसंच ते पुढे प्रसारित करु नये, असं आवाहन पत्र सूचना कार्यालयानं केलं आहे. संरक्षण विभागाच्या कार्यालयाच्या नावानं समाजमाध्यमांवर फिरणारा इशारावजा संदेश खोटा असल्याचं कार्यालयानं स्पष्ट केलं आहे.

जनसंपर्क कार्यक्रम

केंद्रीय मंत्री . नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमाला नागपूरसह संपूर्ण महाराष्ट्राच्या विविध भागातील तसेच इतर राज्यांमधील नागरिकांनीही आज हजेरी लावली. कुणी नव्या प्रयोगांचे प्रेझेंटेशन दिले. तर कुणी कृषी, आयटी आदी क्षेत्राच्या प्रगतीसाठी नव्या कल्पना गडकरी यांच्यापुढे मांडल्या. मंत्री महोदयांनी प्रत्येकाशी संवाद साधला व प्रयोगांचे कौतुक केले.खामला येथील जनसंपर्क कार्यालयात आयोजित या कार्यक्रमासाठी नागरिकांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. यावेळी

‘रोडमार्क फाउंडेशन’ या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी ‘माझा रस्ता माझा मित्र... माझा रस्ता अपघातमुक्त रस्ता’ या महत्वाकांक्षी उपक्रमाची माहिती गडकरी यांना दिली

हवामान

विदर्भातील सर्व जिल्ह्यात तुरळक ठिकाणी पुढील दोन दिवस विजेच्या कडकडाटासह तसेच सोसाट्याच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आज सर्वात जास्त तापमानाची नोंद अमरावती येथे 41 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस इतकी करण्यात आली. दरम्यान, येत्या काही तासात चंद्रपूर, यवतमाळ, अकोला, वाशीम, अमरावती आणि गडचिरोली जिल्ह्यांतील काही ठिकाणी विजांसह हलक्या स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

******